# कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर (का.)

## ता. शिरुर का. जि. बीड.

## राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक अहवाल

## शै. वर्ष 2013-2014

शिरुर कासार तालुका हा नैसर्गीक द्रष्टया आवर्षण ग्रस्त या परिसरात नेहमी आस्मानी संकटाला सामोरे जावे लागते. या भागात माजी खाजदार कै. सौ. केशरबाई क्षीरसागर यांच्या भगीरथ प्रयत्नांतून शिक्षणाची व्दारे बीड जिल्हयाच्या दुर्गम ग्रामीण भागत पोहचली. बीड जिल्हा उसतोड कामगारांचा जिल्हा, मागास जिल्हा अशा अवहेलनेचा विषय बनला आहे. हंगामी शेतीची कामे उरकून उसतोड मजूर म्हणून जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांच्या मनगटात जेवढी ताकद आहे त्यापेक्षा कितीतरी आधिक ताकद त्यांच्या बुध्दीत आहे. या उसतोड कामगारांच्या मुलांच्या बुध्दीची मशागत करूण त्यंना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सौ. केशरबाई क्षीरसागर यांनी आहोरात्र परिश्रम केले. इतर संस्थेबरोबरच आदर्श शिक्षण संस्थेची निर्मिती केली. या संस्थेच्या कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची निर्मिती झाली.आल्पावधीत यशस्वी कामगिरी करूण या परीसराचा सामाजिक विकास करण्याचे ध्यये समोर ठेवले आहे.

ग्रामदैवत कालिकादेवीच्या नावाने सुरू झालेले कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आहे. या महाविद्यालयात उल्लेखनिय कामगिरी करणारा **राष्ट्रीय सेवा योजना** विभाग कार्यरत आहे. प्रत्यक्ष कार्यातून दृष्य परिणाम साकार करणारा एक प्रगत विभाग आहे. या विभागाच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या पायाभूत सुविधेबरोबर विकास कामाची दिशा, स्वच्छतेचे महत्व, स्वंयमशिस्तीचे व शारीरिक कष्टाचे बाळकडू व बौध्दीकतेची मशागत या विभागामार्फत विद्यार्थ्यांची केली जाते. तर समाजालाही विकासाची दिशादिगदर्शन करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना व महाविद्यालय प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब यांच्या मार्गदर्शनाखाली अविरत करत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वागिंण विकासाबरोबरच आत्मनिर्भयता व कष्टाची महती शिकवली जाते यातून राष्ट्र विकासाच्या उभारणीत खारीचा वाटा देण्याचे काम या विभागामार्फत चालू आहे.

Scanned by CamScanner

**प्रवेश प्रक्रिया:-**

शै. वर्ष 2013-2014 या वर्षामध्ये पद्वी आभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत नोटीस बोर्डावर नोटीस लावून आर्ज मागवण्यात आले. या कामी 259 विद्यार्थ्यांनी आपले अर्ज विभागात सादर केले. परंतू विद्यापीठाच्या मर्यादेमध्ये हे विद्यार्थी बसवणे अवघड काम होते. प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब यांच्या मार्गदर्शनाखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. त्या समितीत कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे, प्रा. संजय सावते व प्रा.चौधर यु.एन. यांच्या समितीने अर्जांची छानणी करूण 200 निवडक विद्यार्थ्यांची यादी नोटीस बोर्डावर लावण्यात आली व त्याची एक प्रत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडे खास दुतामार्फ्त सादर केली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या नियमित कार्यक्रमाच्या वार्षीक आराखडयास प्राचार्यांनी मान्यता दिली. या विभागामार्फत **स्वच्छता आभियान, हागंदारी मुक्त गाव, परिसार स्वच्छता, स्वंयरोजगार मार्गदर्शन, आंधश्रध्दा निमुर्लन इ. बरोबरच महापुरूषांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या, दिनविशेष, वृक्षारोपन इ. विषयावर प्रसंगी कार्य चर्चासत्र, व्याख्याने** इ. विषय असलेला आराखडा मंजूर करण्यात आला व शैक्षणिक वर्षे 2013-2014 या वर्षात अमलबजावणी करण्याचा प्रयत्न झाला.

दि. 01/08/2013 रोजी महाविद्यालयात लोकशाहिर आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे आध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून श्री.शाम सानप हे होते. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलतांना प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब म्हणाले की, आजचा भारत स्वातंत्र्य चळवळीतील स्वातंत्र्यविरानी निर्मान केला असुन त्यांच्या विचारसरणीची आज भारताला अवश्यकता आहे. लोकशाहिर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळकयां सारख्या विचारवंताची देशातील तरुनांना आवश्यकता आहे. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. अशोक घोळवे यांनी केले सुत्रसंचालन प्रा. संजय सावते यांनी केले तर आभार प्रा. नवनाथ पवळे यांनी मानले. या प्रसंगी स्वंयसेवकांना आल्पोपहार व एन. एस. एस. डायऱ्या देण्यात आल्या. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थ्यानी मोठया संख्येने उपस्थित होते.

Scanned by CamScanner

दि 15/08/2013रोजी महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला या प्रसंगी स्वंयसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दि. 23/08/2013 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या 53 व्या वर्धापन दिनाची औचित्य साधून महाविद्यालयात व्याख्यानाच आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्राचार्य् डॉ. हनुमंत रणखांब यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. अशोक घोळवे यांनी केले सुत्रसंचालन प्रा. संजय सावते यांनी केले तर आभार प्रा. विठठल जाधव यांनी मानले. या प्रसंगी स्वंयसेवक मोठया संखेने उपस्तीत होते. या प्रसंगी स्वंयसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दि. 05/09/2012 रोजी महाविद्यालयात शिक्षकदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून साहितत्यिक विठठल जाधव तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब हे होते. या प्रसंगी बोलतांना प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब म्हणले की, शिक्षण वाघीनीचे दुध आहे हे ज्यांना समजले त्यांनी इतिहासाची पाणे सुवर्ण अक्षरांनी लिहिली. शिक्षण समाजाचा श्वास असुन ज्या समाजात शिक्षणचे प्रमाण अधिक शिक्षण, शिक्षक, समाज आणि व्यवस्था यांचा समतोल हाच देशाच्या प्रगतिचा कणा आहे. असे म्हणाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एन. एस. एस. कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे यांनी केले तर आभार संजय सावते यांनी मानले. या प्रसंगी स्वंयसेवकांना आल्पोपहार देण्यात आला.

दि. 17/09/2013रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वंयसेवकांनी गावात प्रभात फेरी काढून जनजागृती केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हनुमंत रणखांब यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. या वेळी महाविद्यालयाच्या परिसरात पडलेला कचरा गोळाकरून बाहेर टाकण्यात आला. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना आल्पोपहार देण्यात आला.

Scanned by CamScanner

दि. 24/09/2013 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने श्रमदान करण्यात आले. महाविद्यालय परिसराची स्वच्छता करण्यात आली. वृक्षरोपनासाठी खड्डे खोदण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हनुमंत रणखांब यांनी मार्गदर्शन करतांना म्हणाले की, श्रमाचे मुल्य जाना श्रमामुळे व्यक्ती मोठया बनतात. शरीरातून घाम गळेपर्यंत केले पाहिजे. कष्टातून मिळालेली भाकरी समाधान आणि आनंद देते व परिणामी राष्ट्राची सेवा आपोआपच घडते आसेही ते म्हणाले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना आल्पोपहार व चहा देण्यात आला.

दि. 03/10/2013 रोजी महात्मा गांधी यांची जयंती साजरीकरण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रम घेण्यात आला.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हनुमंत रणखांब यांनी मार्गदर्शन करतांना म्हणाले की,अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळविनारे भरत हे एकमेव राष्ट्र आहे. म. गांधी यांचे विचार मानवी जिवनाच्या सर्वांगाना स्पर्श करणारे आहेत .त्यांनी स्वातंत्र्य,ग्रामजीवन,स्वावलंबी जीवन,ग्रामोधेग इ. विषयी त्यांनी आपले विचार व्यक्त केले.

दि २६/०१/२०१४रोजी महाविद्यालयात गणराज्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला या प्रसंगी स्वंयसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

दि.३१/०१/२०१४ ते दि.०७/०२/२०१४ या कालावधित राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर मौजे गोमळवाडा या ठिकाणी खेळीमेळीच्या वातावरणत पार पडल

दि. २०/०२/२०१४ रोजी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे आध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून श्री.शाम सानप हे होते. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलतांना प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यतुन निर्मान केले असुन त्यांच्या विचारसरणीची आज भारताला अवश्यकता आहे.

Scanned by CamScanner

.कार्यक्रमाचे प्रस्ताविक इतिहास विभग प्रमुख प्रा. विठ्ठल गुंडे यांनी केले सुत्रसंचालनडॉ. अशोक घोळव यांनी केले तर आभार प्रा. संजय सावते यांनी मानले. या प्रसंगी स्वंयसेवकांना आल्पोपहार देण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाधिकारी

Principal
प्राचार्य
Kalikadevi Arts, Comm. & Sci. College,
Shirur (Ka), Dist. Beed.

Scanned by CamScanner

# कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर (का.)

## ता. शिरूर का. जि. बीड.

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर कार्य अहवाल

## शै. वर्ष 2012-13 -14

आदर्श शिक्षण संस्था बीडचे कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 31जानेवारी 2014 ते 07 फेब्रुवारी 2014 या कालावधीत आठदिवसांचे विशेष शिबीर घेण्यात आले. शिरूर तालुक्यातील निसर्गरम्य सिंदफना (हिंगेवाडी) हे गाव चालू शैक्षणिक वर्षात विद्यापीठाने निर्धारित केलेली संकल्पना जलसंवर्धनासाठी युवक-युवती शिबीर अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले. शिबीर घेण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे व प्रा. संजय सावते आणि डॉ. शाम सानप यांची कमीटी स्थापन केली. या कमिटीने रुपूर, वडळी, सिंदफना (हिंगेवाडी)व राक्षसभुवन या गावची पहाणी केली. शेवटी चेर्चेअंती प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब यांनी सिंदफना (हिंगेवाडी) या गावास पसंती दर्शिवली. या गावचा अहवाल. डॉ. बा. आ. म.विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडे मान्यतेसाठी पाठवला व विद्यापीठानेही या गावास मान्यता दिली.

दि.31जानेवारी 2014 रोजी गावचे सरपंच सौ.तोलाबाई भगवानराव काकडे उपसरपंच सतीश महाडीक,यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. या बैठकित रा.से.यो.चे स्वंयसेवक काय काम करणार आहेत? याची तपशिलवार माहिती कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे यांनी दिली.अशा पध्दतीने गावात जनजागृती करण्यात आली.

दि. 31जानेवारी 2014 रोजी रा.से.यो. स्वंयसेवक दुपारीच गावात पोहचले. रहाण्याची व्यवस्था पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, साडपाण्याची व्यवस्था केली. अजूबाजूचा परिसर स्वच्छ आणि सुंदर केला.उदघाटण समारंभाची व्यवस्था केली.

दि.01फेब्रुवारी 2014 रोजी सकाळी शिबीरार्थी स्वंयसेवकांनी उद्घाटन ठिकानाचा परिसर स्वच्छ केला. त्यावर शिबीरार्थी विद्यार्थीनीनी सुंदरशा रांगोळी काढल्या. त्याने आलेले पाहुणे अनंदून गेले.

शिबीराचे उद्घाटक मा.डॉ. राजेश तांदळे यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब हे होते.

Scanned by CamScanner

शिबीराचे उद्घाटकमा.डॉ. राजेश तांदळे यांनी शिबीरार्थ्यांना मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांना 'श्रमदानाचे महत्व पटून दिले. आपण करत असलेले' श्रम इतरांना आपल्या कृतीतून दाखवून दयावे. ही प्रेरणा लोक घेतील असे कार्य शिबीरार्थ्यांकडून आपेक्षीत आहे. श्रमाला आणि घामाला किमत आहे. घाम नाही तर काम नाही, काम नाही तर दाम नाही, त्यामुळे भविष्यकाळ उज्वल करण्यासाठी आजपासूनच घाम गाळण्यास सुरूवात करावी जेनेकरून शिबीरार्थी उज्वल भविष्याचे पाईक बनतील.या प्रसंगी प्रमुख वक्त्यांची भाषणे झाली. व कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. अशोक घोळवे यांनी केले सुत्रसंचलन प्रा. संजय सावते यांनी केले आभार प्रा.डॉ. चेतना डोंगळीकर यांनी मानले या कार्यक्रमास शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी सह ग्रामस्त स्वंयसेवक मोठया संखेने उपस्तीत होते.

**सांडपाण्याची व्यवस्था:-**

मौजे सिंदफना (हिंगेवाडी) या गावातील नाल्यांचे सांडपाणी रसत्यावर सोडून देण्यात आले होते. त्यातून गावात दुर्गंधी पसरून रोगराईला मोठयाप्रमाणात ग्रामस्थांना सामोरे जावे लागत होते. परंतू या काळात शिबीरार्थी स्वंयसेवकांनी शोषखड्डे खोदून सांडपाण्याची व्यवस्था केली त्यामूळे शिबीराच्या काळात पाण्याचे योग्य नियोजन झाल्याचे समाधान लाभते.

**गांवाची संपूर्ण स्वच्छता:-**

गावात रसत्याच्या कडेला गाजरगवत, बाभळीची झाडे, इतर गवत व झाडेझूडपे मोठया प्रमाणात वाढलेली होती. शिबीर काळात स्वंयसेवकांनी झाडेझूडपे तोडली. या कामी गावकरीही प्रत्यक्ष कार्यात सहभागी झाले होते.

दि. 02/02/2014 रोजी प्रा. डॉ. बबन चौरे,प्रा. अरुण राख यांनी राष्टीय एकात्मतेत युवकांची भुमिका या विषयावर आपले आभ्यासपुर्ण व्याख्यान दिले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. संजय सावते हे होते. त्यांनी बोलतांना स्वंयसेवकांना श्रमाचे, कष्टाचे महत्व विषद केले.

दिं.03/02/2014 रोजी प्रा. डॉ. मधूकर क्षीरसागर यांचे युवक आणि पर्यावरण या विषयावर व्याख्यान झाले. या प्रसंगी कार्यक्रमाचे आध्यक्ष कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक घोळवे हे होते. प्रमुख वक्ते म्हणून बोलतांना डॉ. मधूकर क्षीरसागर`

Scanned by CamScanner

म्हणाले की, जागतिकीकरणात शेतकरी सुखी झाला आहे, परंतू त्याला लुटणाऱ्या आणेक टोळया ही निर्माण झाल्या आहेत. तरूणानी शिक्षीत होऊन खेडयांचा विकास करकरताना पर्यावरण महत्वाचे आहे. तरुणांनी एकत्रित येऊन गावचा विकास करावा असे आवाहण त्यांनी केले.विकासा बरोबर आपले शिल तितकेच महत्वाचे आहे असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रिती मुळे हिने केले तर आभार शेख करिष्मा हिने माणले.

दि. 04/02/2014 डॉ.चेतना डोंगळीकर यांचे लैंगीक शिक्षण या विषयावर आभ्यासपुर्ण् व्याख्यान व्याख्यान झाले. त्या बोलतानां म्हणाल्या की.तरुणामध्ये लैंगीक शिक्षणाचा अभाव आहे. या कार्यक्रमाच्या आध्यक्षीय स्थानी एन. एस. एस. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अशोक घोळवे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्वत याने केले तर सुत्रसंचालन शेख करिष्मा हिणे केले. आभार प्रदर्शन खोले सोनाली हिने मानले मानले. या कार्यक्रमास ग्रामस्थ व स्वंयसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

दि. 05/02/2013 रोजी डॉ. प्रिती बडे,डॉ. सुषमा सानप,डॉ.अंजली खेडकर यांनी तारुण्यातील अरोग्य विषयक समस्या कारणे व उपाय या विषयावर आपले अभ्यास पुर्ण विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिबीरार्थी गाडेकर नम्रता हिने केले. तर सुत्रसंचालन सानप सोनाली हिने केले . आभार गाडेकर ज्योती हिने मानले.

दि. 06/02/2013 रोजी कैलास दौंड, विठठल जाधव डॉ.ज्ञानेश्वर लाड अनंत कराड भागीनाथ बांगर संजय डोरले रा.ज. कातखडे यांचे

या कार्यक्रमाची प्रास्ताविक,सुत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक घोळवे यांनी केले तर शिबीरार्थी माणे सुनिता आभार हिने केले.

**समारोपः-**

शिबीराचा समारोप हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील आत्यंत भावस्पर्षी प्रसंग असतो. यावेळी आपल्या मित्र-मैत्रिणीपासून दुरावण्याचा प्रसंग असतो. गावचा स्नेह दुरावनारा असतो. अशा या जड अंतकरणाने निरोप देण्याचा हा प्रसंग होता.

Scanned by CamScanner

निरोप संमारंभा प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे शिरूर कासार पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक श्री. इंदलसिंह बहुरे, सरपंच तोलाबाई काकडे,भगवानराव काकडे ह.भ.प. त्रिविक्रमानंद शास्त्री,मु.अ.मस्के सर, डॉ.शाम सानप इत्यादी प्रमुख पाहूण्यांच्या उपस्थितीत व प्राचार्य डॉ. हनुमंत रणखांब यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.या प्रसंगी मान्यवरांची भाषणे झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अशोक घोळवे यांनी केले सुत्रसंचालन डॉ. चेतना डोंगळीकर यांनी केले. तर आभार प्रा. संजय सावते यांनी मानले.

या प्रसंगी समारोपाचे स्वदिष्ट भोजन सरपंच तोलाबाई काकडे,भगवानराव काकडे यांनी दिले व कार्यक्रम संपल्यानंतर जड अंतकरणाने स्वंयसेवकांनी सिंदफना या गावचा निरोप घेतला.

**कार्यक्रमाधिकारी**

प्राचार्य

Principal
Kalikadevi Arts, Comm. & Sci. College
Shirur (Ka), Dist. Beed.

Scanned by CamScanner